# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

एक्सप्रेस टॉवर्स,
नरीमन पॉईट,
मुंबई – ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२८१
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एसटीडी : ०२२

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/2260 दिनांक : १६.१०.२००३

परिपत्रक क्र. ९४

विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील पाणी पुरवठा योजनांच्या मोहरबंद निविदा सादर करताना व ठेकेदारांनी नोंदणी प्रस्ताव सादर करताना अद्यावत आयकर प्रमाणपत्र न जोडणेबाबत..

मजीप्राकडून ज्या कामांच्या निविदा मागविण्यांत येतात त्या कामांचे मोहोरबंद देकार सादर करीत असताना लखोटा क्र. १ मध्ये इतर आवश्यक कागदपत्रांसह अद्यावत आयकर प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक करण्यांत आले आहे. त्यानुसार लखोटा क्र. १ मध्ये अद्यावत आयकर प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास निविदा देकाराचा लखोटा क्र. २ उघडण्यात येतो. त्याचप्रमाणे मजीप्राकडे ठेकेदाराची नोंदणी करताना प्रस्तावासोबत अद्यावत आयकर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यांत आले आहे व त्यानुसार कार्यवाही होत आहे.

दरम्यान केंद्र शासनाच्या Ministry of Finance and Company Affairs Department of Revenue यांच्या दि. १३.२.२००३ च्या पत्रांनुसार निविदा सादर करताना आयकर निपटारा प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करण्याची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे. या पत्रामधील सूचनांनुसार आयकर विभागाने कंत्राटदारांना आयकर निपटारा प्रमाणपत्र देणे बंद केले आहे. त्यामुळे निविदा देकार उघडण्यात व कंत्राटदारांची नोंदणी देणे याबाबत अडचणी निर्माण होत आहेत. या अनुषंगाने मजीप्राच्या निविदा समितीच्या ४२ व्या बैठकीमध्ये सर्वंकष चर्चा करुन घेण्यात आलेल्या निर्णयाच्या आधिन राहून खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

मजीप्राकडील पाणी पुरवठा/ मलनिःसारण योजनांच्या निविदांसाठी आयकर निपटारा प्रमाणपत्र आवश्यक राहणार नाही त्यामुळे तसा बदल निविदा कागदपत्रांच्या अटी व शर्तीमध्ये करण्यात यावा. तसेच मजीप्राकडील ठेकेदार नोंदणी नियमामध्येदेखील आयकर निपटारा प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही, असा बदल करण्यात येत आहे. त्यामुळे ठेकेदारांच्या मजीप्राकडील नोंदणीसाठी आयकर निपटारा आवश्यक राहणार नाही.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन व्हावे. उपरोक्त आदेश या परिपत्रकाच्या दिनांकापासून लागू राहतील.

(दीपक भसाळे)
सदस्य सचिव

प्रत : मा. मंत्री, ग्राम विकास व पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई-३२, यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : मा. राज्य मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय, मुंबई-३२, यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : मा. राज्य मंत्री, नगर विकास, मंत्रालय, मुंबई-३२, यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत : प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांना माहितीस्तव सादर.

प्रत : वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत : मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत : सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा, माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

प्रत : सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा., माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

Board Meeting58